# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

## क्र. मुमाआ/नों. क्र. २९/१९/अ.क्र. ३२३/२१/०१

श्री. सुशीलकुमार अग्रवाल
गुरु हिम्मत को.-ऑप.हौ.सो.,
ए विंग, दुसरा मजला, फलॅट क्र. ५,६,
डॉ. म्हस्कारेन्हास रोड, माझगांव,
मुंबई – ४०००१०.

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का)**
ई विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त ई विभाग
यांचे कार्यालय, १ला मजला, १० शेख हफिजुद्दिन मार्ग,
भायखळा (प), मुंबई ४०० ००८.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता ई विभाग**
ई विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त ई विभाग
यांचे कार्यालय, १ला मजला, १० शेख हफिजुद्दिन मार्ग,
भायखळा (प), मुंबई ४०० ००८.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ११.१०.२०२१/०६.१२.२०२१/२७.०१.२०२२/ ०३.०३.२०२२/ ३१.०३.२०२२/१७.०५.२०२२**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित |
| जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

उक्त प्रकरणी दिनांक ११.१०.२०२१ रोजी आयोगाने पुढीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत:

"अपीलकर्त्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम-६(१) अन्वये दि. २५.०९.२०१८ रोजी जन माहिती अधिकाऱ्याकडे माहिती अर्ज सादर केला. सदर अर्जान्वये त्यांनी, ई विभाग मनपा कार्यालयाच्या हद्दीत हार्बर क्रेस्ट बिल्डिंग डॉ. मस्करन्हसू रोड, माझगांव, मुंबई-४०० ०१० या ठिकाणी पूल अ‍ॅण्ड स्नुक-राजेश सिंग या व्यक्तीने तळघर (बसमेंट) मध्ये दुकानाचे बांधकाम केलेले आहे त्या बांधकामाची सविस्तर माहिती/छायांकित कागदपत्रांची मागणी केलेली होती.

अपीलकर्त्याने आयोगाकडे दि. ०३.०१.२०१९ रोजीच्या अर्जान्वये द्वितीय अपील दाखल केले असून त्याद्वारे असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिलेली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०९.१०.२०१८ रोजी असे उत्तर देण्यात आले की, आपण विचारलेली माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपाची असून सदर बाब माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २ मध्ये नमूद केलेल्या "माहिती" या व्याख्येत मोडत नसल्याने माहिती देता येत नाही.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. १७.१२.२०१८ च्या आदेशान्वये अपिलकर्ता यांनी केलेल्या निवेदनान्वये अपिलकर्त्यांस सदर माहिती आवश्यक असल्यास पुन:श्च नव्याने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अर्ज विहित नमुन्यात सादर करुन माहिती प्राप्त करुन घ्यावी असे आदेश देऊन अपिल निकाली काढले.

आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का), श्री. पंकज जाधव व प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता ई विभाग, श्री. फत्तेसिंग चव्हाण उपस्थित आहेत.

कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर असा निष्कर्ष दिसून येतो की, अपिलकर्ता यांनी त्रयस्थ पक्षाची माहिती मागणी केलेली आहे.

जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांना असे आदेश देण्यात येत आहेत की, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये कलम ११ नुसार त्रयस्थ पक्षाला विचारणा करण्यात यावी की, अपिलकर्ता यांना माहिती देण्यास त्यांचा काही आक्षेप आहे किंवा नाही.

अपिलकर्ता अनुपस्थित आहेत.

तरी अपिलाची सुनावणी तहकूब करण्यात येत आहे. सदर **अपिलाची पुनर्सुनावणी दिनांक ०६.१२.२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता** आयोगात प्रत्यक्ष आयोजित करण्यात येत आहे. तरी अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी स्वत: उपस्थित राहावे. त्यानंतर या प्रकरणी अंतिम आदेश पारित करण्यात येतील."

उक्त प्रकरणी दिनांक ०६.१२.२०२१ रोजी आयोगाने पुढीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत:

"आजच्या पुनर्सुनावणीस अपिलकर्ता यांच्या पत्नी श्रीमती मोनिका अग्रवाल उपस्थित असून त्यांनी विशद केले की, अपिलकर्ता आजारी असल्यामुळे ते आजच्या सुनावणीस उपस्थित राहू शकत नाही. तरी त्यांना पुढची तारीख पाहिजे.

जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी म्हणून श्री. अमोल गवळी, कनिष्ठ अभियंता उपस्थित असून त्यांनी विशद केले की, अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती त्रयस्थ पक्षाची असल्यामुळे दिनांक ०४.१२.२०२१ रोजी त्रयस्थ

पक्षांना पत्र पाठविण्यात आले की, अपिलकर्ता यांना माहिती देण्यास काही हरकत आहे किंवा नाही. यास्तव अपिलाची सुनावणी तहकूब करण्यात येत आहे. सदर **अपिलाची पुनर्सुनावणी दिनांक २७.०१.२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता आयोगात प्रत्यक्ष** आयोजित करण्यात येत आहे. तरी अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष श्री. राजेश सिंग यांनी पुढील सुनावणीस स्वत: प्रत्यक्ष उपस्थित राहावे. त्यानंतर या प्रकरणी अंतिम आदेश पारित करण्यात येतील."

उक्त प्रकरणी दिनांक २७.०१.२०२१ रोजी आयोगाने पुढीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत:

"दृकश्राव्य माध्यमाद्वारे आजच्या पुनर्सुनावणीस अपिलकर्ता व अपिलकर्ता यांचे प्रतिनिधी श्रीमती मोनिका अग्रवाल उपस्थित असून त्यांनी असे विशद केले की, त्यांना आजतागायत जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नाही.

जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. तरी अपिलाची सुनावणी तहकूब करण्यात येत आहे. पुढील सुनावणीस जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना अपेक्षित असलेल्या माहितीसह उपस्थित राहावे. सदर **अपिलाची पुनर्सुनावणी दिनांक ०३.०३.२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता** आयोगात प्रत्यक्ष आयोजित करण्यात येत आहे. तरी अपिलकर्ता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी स्वत: उपस्थित राहावे. त्यानंतर या प्रकरणी अंतिम आदेश पारित करण्यात येतील."

उक्त प्रकरणी दिनांक ०३.०३.२०२२ रोजी आयोगाने पुढीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत:

"आजच्या पुनर्सुनावणीस अपिलकर्ता यांच्या पत्नी श्रीमती मोनिका अग्रवाल, जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का) श्री. अबरार खान उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असे विशद केले की, त्रयस्थ पक्ष श्री. राजेश सिंग यांनी दिनांक २५.०१.२०२२ रोजीच्या पत्रान्वये अपिलकर्ता यांना माहिती देण्यास नाकारले.

अपिलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांना जी माहिती हवी आहे ती जनहिताशी संबंधित आहे. तसेच पूल ॲण्ड स्नुक पार्लर ज्या इमारतीच्या तळघर (बेसमेंट) मध्ये बांधण्यात आले ती रहिवासी इमारत आहे.

जन माहिती अधिकारी यांना असे आदेश देण्यात येत आहेत की, पूल ॲण्ड स्नुक पार्लर हे नियमित आहे किंवा नाही याबाबतचा खुलासा पुढील सुनावणीस आयोगात सादर करावा व या प्रकरणाची मूळ धारिका सोबत घेऊन यावी.

तरी अपिलाची सुनावणी तहकूब करण्यात येत आहे. सदर **अपिलाची पुनर्सुनावणी दिनांक ३१.०३.२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता** आयोगात प्रत्यक्ष आयोजित करण्यात येत आहे. तरी अपिलकर्ता, जन माहिती

अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी स्वत: उपस्थित राहावे. त्यानंतर या प्रकरणी अंतिम आदेश पारित करण्यात येतील."

उक्त प्रकरणी दिनांक ३१.०३.२०२२ रोजी आयोगाने पुढीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत:

"आजच्या पुनर्सुनावणीस अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का) श्री. अबरार खान उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असे विशद केले की, त्यांनी इमारत प्रस्ताव विभागाला दिनांक २१.०३.२०२२ रोजी पत्र पाठविण्यात आले की, संबंधित इमारतीचा मंजूर आराखडा देण्यात यावा. मंजूर आराखडा प्राप्त झाल्यावर कळेल की, पूल ॲण्ड स्नुक पार्लर हे नियमित आहे किंवा नाही.

तरी अपिलाची सुनावणी तहकूब करण्यात येत आहे. सदर **अपिलाची पुनर्सुनावणी दिनांक ०५.०५.२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता** आयोगात प्रत्यक्ष आयोजित करण्यात येत आहे. तरी अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी स्वत: उपस्थित राहावे. त्यानंतर या प्रकरणी अंतिम आदेश पारित करण्यात येतील."

आजच्या पुनर्सुनावणी अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. तरी अपिलाची सुनावणी तहकूब करण्यात येत आहे. पुढील सुनावणीस जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना अपेक्षित असलेल्या माहितीसह उपस्थित राहावे. सदर **अपिलाची पुनर्सुनावणी दिनांक २३.०६.२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता** आयोगात प्रत्यक्ष आयोजित करण्यात येत आहे. तरी अपिलकर्ता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी स्वत: उपस्थित राहावे. त्यानंतर या प्रकरणी अंतिम आदेश पारित करण्यात येतील.

State Information Commission Maharashtra

**मुंबई**
**दिनांक : १७.०५.२०२२**

**(सुमित मल्लिक)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**प्रत** : श्री. राजेश सिंग, हार्बर क्रेस्ट बिल्डींग, डॉ. मस्कारहन्स रोड, माझगाव, मुंबई – ४०० ०१० यांनी पुढील सुनावणीस प्रत्यक्ष उपस्थित राहावे.

AARTI